ताळेबंद

# असं जमवा रोपवाटिकेचं 'बजेट'



**डॉ. संदीप मोरे**
सहायक प्राध्यापक
आदित्य कृषी महाविद्यालय, बीड







"रोपवाटिका आपणास किती कालावधीसाठी उभारायची आहे ते आधी ठरवावे. काही रोपवाटिका ह्या अल्पकाळासाठी तर काही रोपवाटिका दीर्घकाळ कार्यरत ठेवणे आवश्यक आणि परवडणारे असते याचा विचार खर्च करताना करणे आवश्यक आहे."

रोपवाटिका प्रस्थापित करण्यापूर्वी तिचं नियोजन आणि कोणकोणत्या बाबीसाठी खर्च करावा लागणार आहे याची माहिती असणे गरजेचे आहे. सध्याची रोपांची मागणी आणि भविष्यकाळातील रोपांची मागणी यांचा विचार करून खर्च करावा तसेच रोपांची निवडही विचारपूर्वक करावी.

रोपवाटिका आपणास किती कालावधीसाठी उभारायची आहे ते आधी ठरवावे. काही रोपवाटिका ह्या अल्पकाळासाठी तर काही रोपवाटिका दीर्घकाळ कार्यरत ठेवणे आवश्यक आणि परवडणारे असते याचा विचार खर्च करताना करणे आवश्यक आहे.

रोपांची किती कलमे आपणास उत्पादित करायची आहेत, एका हंगामात एका वर्षात अथवा ठराविक कालावधीमध्ये किती रोपे तयार करण्याची आहेत याचेही उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून उत्पादन करणे आवश्यक आहे.



आपणास रोपवाटिका उभारणीसाठी किती जमिनीची आवश्यकता आहे व त्या जमिनीची प्रतवारी कशा प्रकारची आहे, ती रोपवाटिका उभारणीसाठी योग्य आहे, की नाही ती जमीन कोठे आहे, त्या जमिनीचे मातीपरीक्षण केलेले आहे, की नाही इत्यादी बाबींची माहिती जमिनीची निवड करताना लक्षात घेणे गरजेचे आहे. त्यासाठी किती खर्च अपेक्षित आहे या गोष्टींचा विचार करावा लागतो.

रोपवाटिका उभारणी केल्यावर त्यास पाणीपुरवठा कसा करायचा आणि त्यासाठी आपल्याकडे पाण्याची उपलब्धता आहे की नाही, पाण्याची गुणवत्ता कशा प्रकारची आहे, पाणी किती वेळ उपलब्ध होते, त्यासाठी खर्च किती येणार आहे; हे बघावे कारण रोपवाटिकेसाठी त्या ठिकाणी सतत पाण्याची उपलब्धता असणे गरजेचे आहे.

रोपवाटिका उभारणीसाठी किती मजुरांची आवश्यकता लागणार आहे, कधी लागणार आहे, मजूर कोठून उपलब्ध होणार आहेत; त्यामध्ये कायमस्वरुपी, हंगामी, ठेकेदारी, कुशल, अकुशल; देखरेख, कार्यालयीन कामे, खरेदी-विक्री, वसुली, इत्यादीसाठी किती मनुष्यबळ लागणार आहे याचा अंदाज रोपवाटिकेचे क्षेत्र, रोपवाटिकेचे स्थान कोणत्या ठिकाणी लागणार आहे, याच्यावर अवलंबून असणार आहे रोपवाटिका प्रस्थापित करताना मजुरांचा खर्च हा महत्त्वाचा घटक आहे आणि त्याचा विचार रोपवाटिका उभारताना करणे अत्यंत आवश्यक आहे.

## आवश्यक खर्चाचा अंदाज

रोपवाटिका जर आर्थिकदृष्ट्या सक्षम करायची असेल तर खर्चाचे आणि उत्पन्नाचे अंदाजपत्रक तयार करणे अत्यंत गरजेचे आहे. अंदाजपत्रक आणि कामाचे नियोजन नसेल तर रोपवाटिका कधीही यशस्वी होत नाही. अनेकदा रोपवाटिकेतून येणारे उत्पन्न होणारी जमा ही बेभरवशाची असते पण करावा लागणारा खर्च मात्र निश्चितच असतो; इतकेच नव्हे तर अगोदर खर्च करावा लागतो व मग काही काळानंतर जमा आवक सुरू होते. खर्चाचा हिशोब ठेवला नाही तर येणारी जमा रक्कमही किती फायद्याची आहे व किती तोट्याची आहे हे समजणार नाही याशिवाय खर्चाचा अंदाज घेतला तर ऐनवेळी होणारा अनावश्यक खर्च टाळता येऊ शकतो. तसेच कोणत्या बाबींवर खर्च कसा होतो व त्यावर नियंत्रण कसे करता येईल हे सुद्धा अंदाजपत्रकावरून ठरवू शकतो. त्यासाठी प्रत्येक रोपवाटिकेत खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे गरजेचे आहे.

## आर्थिक नियोजन

प्रामुख्याने यामध्ये एकूण खर्चाचे नियोजन केलेले असावे. त्यासाठी वेगवेगळ्या निविष्ठा आणि मजुरांवरील खर्चाचे नियोजन करताना त्यात ताळमेळ असणे आवश्यक आहे. सामान्यपणे निविष्ठा मजूर, कामगार यावरील खर्चाचे प्रमाण ३:१ अथवा २:१ असावे. कुठल्याही परिस्थितीत हे प्रमाण १:१ अगर त्यापेक्षा कमी होऊ देऊ नये. अन्यथा होणारा मोठा खर्च फक्त मजुरांवर होऊन पुढील टप्प्यात मजुरांना कमी काम मिळेल; त्यांची काम करण्याची वृत्ती कमी होईल आणि हळूहळू रोपवाटिकेचे उत्पादन घटून ती बंद करावी लागेल. आर्थिक नियोजन करताना ते नुसतेच नियोजन असू नये तर तरतूद करणे गरजेचे आहे. निविष्ठा खरेदी उधारीवर, मजुरांची मजुरी थकीत होऊ नये किंवा खतासाठीची रक्कम औषधे खरेदीस वापरणे किंवा बियाणे घेण्याऐवजी आठवड्याची मजुरी भागविणे असे प्रकार वारंवार घडणार नाहीत अशी काळजी घ्यावी. ■